क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने मातंग समाजातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: सीबीसी-१०/२०१७/प्र.क्र.१७९/मावक,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२.
दिनांक:- १२ ऑक्टोबर, २०१७.

संदर्भ :-सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक बारटी २०१६/प्र.क्र. १२९/बांधकामे, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३

प्रस्तावना :-

शासनाच्या अनुसूचित जाती विषयक कल्याणकारी धोरणाचा मातंग समाजातील व्यक्तींना योग्य प्रमाणात लाभ मिळण्यासाठी त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय असा सर्वांगीण विकास होण्यासाठी सदर समाजाकडून विविध स्तरांवरुन मागणी करण्यात येत होती. त्या अनुषंगाने मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग गठीत करण्यात आला होता. सदर आयोगाने सादर केलेल्या शिफारशी विचारात घेऊन सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय दि. ३१ डिसेंबर, २०११ मधील परिशिष्ट "अ" मधील अ.क्र. ६६ शिफारस क्र. ५१ नुसार मातंग समाज समुदायातील उमेदवारांकरीता स्पर्धात्मक परीक्षेसाठी विभागीय पातळीवर एकूण ६ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र निवास व भोजन व्यवस्थेसह सुरु करण्याचा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णयान्वये घेण्यात आला. त्यामध्ये प्रती विद्यार्थी खर्च व बॅच यांची संख्या यामध्ये वाढ करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

१) संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३ परि. १ अ.क्र. २ दरवर्षी विभागीय स्तरावर प्रती बॅच ५० विद्यार्थी याप्रमाणे ३ बॅचेसना (निवासी) प्रशिक्षण देण्यात यावे. सदर योजनेंतर्गत निवड केलेल्या सहा संस्थांना एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. तदनंतर शासन निर्णय दि.३०/१०/२०१३ मधील मुद्दा क्र. ११ नुसार जाहिरात देवून विहित कार्यपध्दतीने संस्था निवड करण्यात यावी. तसेच सदर संस्थांच्या कार्यपध्दतीचा आढावा घेण्यात यावा.

२. उपरोक्त परि. १ मध्ये नमूद कालावधीसाठी पुढीलप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसारच खर्च करणे बंधनकारक राहील.

अ) प्रशिक्षण कालावधी सन २०१७-१८ -- प्रती बॅच ४ महिने, एकूण ३ बॅचेस

अ.क्र.	बाब	प्रती विद्यार्थी खर्च (द.म.)	प्रती विद्यार्थी ४ महिन्यांसाठी एकूण खर्च
१	भोजन, नास्ता व चहा	रु. ३,५००/-	रु. १४,०००/-
२.	पुस्तक संच	--	रु. ३,०००/-
३.	प्रशिक्षण संस्थेला प्रशिक्षण शुल्क	--	रु. १५,०००/-
४.	निवास खर्च	रु.२५००/-	रु.१०,०००/-
		एकूण खर्च	रु. ४२,०००/-

ब) ५० विद्यार्थ्यांच्या एका बॅचसाठी खर्च = रु. ४२,००० x ५० विद्यार्थी = रु. २१,००,०००/-

क) ६ विभागीय स्तरावर ६ केंद्रांसाठी सन २०१७-१८ या वर्षात प्रत्येक केंद्रासाठी एक बॅच याप्रमाणे सहा बॅचेससाठी खर्च रु. २१,००,०००/- x ६ केंद्र = रु. १,२६,००,०००/-

ड) ६ विभागीय स्तरावर ६ केंद्रांसाठी सन २०१७-१८ या वर्षात प्रती केंद्र ३ बॅचप्रमाणे एकूण ६ केंद्रासाठी खर्च रु. १,२६,००,०००/- x ३ बॅचेस = रु. ३,७८,००,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी अठ्ठयात्तर लाख फक्त)

३. याबाबतचा खर्च मागणी क्र.एन-३, २२२५ अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, (०१) (०२), डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे (विघयो) २२२५ ३६८१ या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मंजूर असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा. उर्वरित तरतुदी संदर्भाधीन शासन निर्णयाप्रमाणे राहतील.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३२८/२०१७, दि.०४.०७.२०१७ व ४०७/२०१७ दि.१८.०८.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१२१७०६११६७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2017.10.12 16:58:23 +05'30'

(दि. रा. डिंगळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव.

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१२. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
१३. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
१४. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा) (लेखा अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, पुणे.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१७. वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प ५) मंत्रालय, मुंबई.
१८. अवर सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवड नस्ती / मावक